# थोर जीवन

## येशूचे जीवन, मरण आणि पुनरूत्थान

मुलांना शिकविणाऱ्यांनी J1b हा अभ्यास वाचावा.

**प्रार्थना:** ''प्रिय स्वर्गीय पित्या, येशूचे ह्या पृथ्वीवरील जीवन अद्‌भुत होते; त्याविषयी शिकण्याने तुझ्या मंडळीचे आणि माझे साहाय्य कर म्हणजे तू आमच्यासाठी केलेल्या कर्याबद्दल आम्ही एकत्रितपणे तुझे आभार मानू''

### 1. थोर जीवनाविषयी शिकवण्यास तुमच्या मनाची व अंत:करणाची तयारी करा

तुमच्या मंडळीला येशूची सुवार्ता सोप्या भोषत शिकवा म्हणजे त्यांना ती इतरांना सांगता येईल.

येशू ह्या जगात येण्यापूर्वी जुन्या करारातील संदेष्ट्यांनी, यहूदी लोक ज्याला मसीहा म्हणतात त्याच्याविषयी 300 पेक्षा अधिक भाकिते केलेली होती.

पाहा पुढे दिलेल्या सात संदेष्ट्यांनी जगामध्ये अभिवचनाने देऊ केलेल्या मसीहाच्या (ख्रिस्त) येण्याविषयी काय सांगितले आहे.

अ) अब्राहाम (उत्पत्ती 22:18)

ब) मोशे (अनुवाद 18:18-19)

क) यशया (यशया 53:7-8)

ड) दावीद (स्तोत्र 2:7)

ई) दावीद (स्तोत्र 16:8-11)

फ) नाथान (2 शमूवेल 7:16)

ग) बाप्तिस्मा करणारा योहान (लूक 3:15-17)

मसीहा ह्या जगात आला तेव्हा त्याला अनेकांनी प्रत्यक्ष पाहिले. त्याने केलेल्या गोष्टी पाहिल्या व ऐकल्या आणि त्यांच्यापैकी काही जणांनी हे सर्व नव्या करारातील पुस्तकांमध्ये लिहून ठेविले आहे. येशूच्या शिष्यांनी त्याच्याविषयी सात गोष्टी सांगितल्या. त्यांच्या दृष्टीने ह्या गोष्टी महत्वाच्या आहेत:

अ) येशू ह्या पृथ्वीवर असतांना त्याने लोकांसाठी केलेल्या कृत्यांमधून तो होता ते लोकांना दाखविले. पुढे पवित्र शास्त्रातील शास्त्रभाग दिले आहेत. त्यात येशूने काय केले ते शोधा:

- दृष्टी नसलेल्या लोकांसाठी (मत्तय 9:27-31)
- भूत लागलेला माणूस (मत्तय 9:32-33)
- मरण पाविलेले मूल (लूक 8:49-55)

ब) येशूने लोकांना देवाचे पवित्र्य, विश्वास कसा ठेवावा आणि पवित्र व आनंदी जीवन कसे जगावे याविषयी शिकविले. बी पेरणारा अशा सारख्या उदाहरणातून त्याने साध्या साध्या गोष्टींविषयी शिकविले पुढील शास्त्रभाग पाहा:



- देव कोणत्या प्रकारच्या लोकांना आशीर्वादित करणार (मत्तय 5:1-16)
- येशूच्या शिष्यांचे जीवन कसे असले पाहिजे (योहान 14:1-17)
- जगाचे भवितव्य काय आहे (मत्तय 21:31)

क) येशूच्या शत्रूनी त्याला लाकडाच्या वधस्तंभावर खिळले तेव्हा तो मेला. पुढील शास्त्रभाग पाहा:

- येशूला ठार मारण्याची कोणाची इच्छा होती (लूक 23:12-21)
- येशूला कशा प्रकारे ठार केले (लूक 23:32-34)
- येशू कसा मरण पावला (लूक 23:44-53)

ड) तीन दिवसांनंतर देवाने येशूला पुन्हा उठविले.

- येशूने त्याच्या मरणापूर्वी सांगितले त्यानुसार (मार्क 9:31-32)
- स्वर्गातील देवदूतांनी सांगितल्या प्रमाणे (मत्तय 28:1-10)
- येशूने मरणातून उठल्यानंतर स्पष्ट केल्याप्रमाणे (प्रकटी 1:17-18)

ई) येशूने त्याला ओळखणाऱ्या अनेक लोकांना दर्शन दिले आणि ते त्याचे साक्षी झाले. पाहा:

- येशूने तो जिवंत असल्याचे कसे सिद्ध केले (लूक 24:36-43)
- येशू कशाविषयी बोलला (प्रे. कृ. 1:1-3) "कशाविषयी बोलला?" अस्पष्ट
- त्याने कोणा कोणाला दर्शन दिले (1 करिंथ 15:3-8)

फ) येशूने त्याच्याकडे येणाऱ्या प्रत्येकाला क्षमा करण्याचे अभिवचन दिले आहे. पुनरूत्थित ख्रिस्ताने काय म्हटले ते पुढील शास्त्रभागांत पाहा:

- पातकांच्या क्षमेविषयी (लूक 24:44-48)
- देवाच्या पवित्र आत्म्याविषयी (प्रे. कृ 1:4-8)
- येशूचे शिष्य कसे होता येते (मत्तय 28:16-20)

ग) येशू परत येईपर्यंत देवाने त्याला स्वर्गात नेले पुढील शास्त्रभागांत पाहा:

- येशूच्या शिष्यांना काय सांगितले (प्रे. कृ. 1:9-11)
- येशूने त्याच्या शिष्यांना काय सांगितले (मार्क 14:60-62)
- इतरांची सेवा करणाऱ्यांना येशू म्हणेल (मत्तय 25:31-34)

**2. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या आठवड्यातील कार्यक्रम ठरवा.**

- तुमच्या संस्कृतीमध्ये चित्र काढण्याची परवानगी असेल तर येशू विषयीच्या सात सत्य गोष्टी एखाद्या कलाकाराला रंगवायला किंवा चितारायला सांगा. येशूविषयीच्या मुख्य गोष्टी ठेवून सांगण्याचा सराव करा. मग याबद्दल लोकांना घरोघरी जाऊन सांगा. हे सांगताना चित्रे दाखवा.
- एक प्रशिक्षण चर्चासत्र आयोजित करा. त्यामध्ये विश्वासणाऱ्यांना चित्रे गाणी कविता यांचा वापर करून येशूविषयी सांगण्याच्या सूचना द्या. या गोष्टी करतांना त्यांची संस्कृती लक्षात घेण्यास सांगा.

**3. तुमच्या सहकाऱ्यांशी चर्चा करून येणाऱ्या उपासनासभेसाठी योजना आखा.**

सध्याच्या गरजा आणि स्थानिक रिवाजांनुसार कार्यक्रमांची निवड करा.

नाट्यीकरण करा भाग 1 मध्ये अभ्यासलेले येशूच्या जीवनातील एका वा अधिक प्रसंग.

भाग 1 मध्ये तुम्ही ख्रिस्ताविषयी शिकलेल्या सात महत्वाच्या गोष्टी सांगून त्यावरचे प्रश्न विचारा: मंडळीला त्यांना माहीत असलेली उत्तरे देऊ द्या. त्यांना आठवणार नाही तेवढाच भाग फक्त सांगा.

- येशूविषयी संदेष्ट्यांनी काय भविष्य वर्तविले.
- येशूने लोकांसाठी काय केले.
- येशूने आमचे जीवन कसे असावे आणि जगाचे भवितव्य याबद्दल काय शिकविले.

- येशू कसा मरण पावला आणि मरणातून पुन्हा कसा उठला.
- येशूने मरणातून पुन्हा उठल्यावर कोणा कोणाला दर्शन दिले.
- पश्चात्ताप करून त्याच्या मागे जाणाऱ्या विश्वासणाऱ्यांना पुनरूत्थित ख्रिस्ताने कोणते अभिवचन दिले.
- येशूने अखेरीस ही पृथ्वी कशी सोडली.

मुलांनी तयारी केलेली नाटिका, कविता व प्रश्न सादर करण्यास त्यांना संधी द्या.

प्रभूभोजनाची ओळख करून देण्यासाठी इब्री 7:7-12 वाचा. जुन्या करारातील मुख्य याजक पशूंचे रक्त परमपवित्र स्थानात प्रवेश करीत, त्याप्रमाणे नाही तर येशू त्याच्या स्वत:च्या रक्ताने आपल्या पित्याच्या समक्षतेत गेला हे समजून सांगा. भाग 1 मध्ये येशूचे वधस्तंभावरील मरण आणि त्याचे शेवटचे आगमन याविषयी तुम्ही केलेल्या अभ्यासातील संदर्भ तुम्हाला वाचता येतील.

**पाठ करा** इब्री 1:1-2

मंडळीला लहान लहान गट करून एकमेकांसाठी प्रार्थना करण्यास सांगा. तसेच येशूविषयीच्या गोष्टी त्याचे सर्व कुटुंबिय, इष्टमित्र आणि त्यांच्या जवळ व दूर असणाऱ्या इतर लोकांमध्ये प्रसारित व्हाव्यात अशी देवाला विनंती करा.

Copyright 2004 © by Paul-Timothy. May be freely copied. Download from www.Paul-Timothy.net